मूलभूत विज्ञानजागृती

# 'आयसर'ला देशभरातून प्रतिसाद

## पाषाणला केंद्र : तीन जूनपासून ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया; १०० जणांना मिळणार प्रवेश

**मयूरेश प्रभुणे : सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. २९ : मूलभूत विज्ञानाकडे विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी केंद्र सरकारकडून तीन वर्षांपूर्वी 'आयआयटी'च्या धर्तीवर सुरू करण्यात आलेल्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च'ला (आयसर) या वर्षी देशभरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. 'आयआयटी- जेईई'च्या निकालानंतर लगेचच 'आयसर'मध्ये प्रवेशाच्या चौकशीसाठी दररोज शेकडो दूरध्वनी आणि ई-मेल येत असल्याचे, संस्थेच्या अधिकाऱ्यांनी 'सकाळ'ला सांगितले. केंद्रीय प्रवेश प्रक्रिया असूनही उत्तम शैक्षणिक वातावरण, जवळच असणाऱ्या नामवंत संशोधन संस्थांमध्ये मिळू शकणारा कार्यानुभव आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांमुळे देशभरातील पाच 'आयसर'पैकी पुण्यालाच विद्यार्थी आणि पालकांची पहिली पसंती असल्याचे पाहणीत दिसून आले आहे.

देशातील पहिले 'आयसर' पुण्यात उभे राहावे यासाठी 'राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळे'ने (एनसीएल) इमारतीसाठी जमीन, तात्पुरती शैक्षणिक इमारत, तसेच विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उपलब्ध करून दिले. देशविदेशांतून अनेक अनुभवी शास्त्रज्ञांना प्राध्यापक म्हणून पाचारण करण्यात आले आहे.

कोट्यवधी रुपये खर्चून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक आणि संशोधनाच्या सुविधा उभारण्यात आल्या. मात्र, एवढे करूनही मूलभूत विज्ञानाकडे विद्यार्थी येतील की नाही, याची चिंता संस्थाचालकांना लागलेली होती. मागील वर्षीपर्यंत 'आयसर'ला मिळणारा प्रतिसाद सामान्यच होता. 'आयआयटी'च्या निकालानंतर देशभरातील विद्यार्थी आणि पालक पुणे 'आयसर'मधील अभ्यासक्रमाची, येथील सोईंची चौकशी करत असल्याचे, 'आयसर'च्या प्रवेशप्रक्रिया विभागाचे प्रमुख प्रा. अरविंद नातू यांनी 'सकाळ'ला सांगितले.

ते म्हणाले, "सध्या आम्हाला देशाच्या सर्व भागांतून प्रवेशाच्या चौकशीसाठी दूरध्वनी येत असून, काही विद्यार्थी आणि पालक प्रत्यक्ष भेट घेत आहेत. त्यातील काही विद्यार्थी 'आयआयटी'च्या मुख्य यादीतील, तसेच 'किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजने'ची शिष्यवृत्ती मिळालेलेही आहेत. चालू वर्षात पुणे, मोहाली, कोलकता येथील 'आयसर'मध्ये प्रत्येकी १००, तर भोपाळ आणि तिरुअनंतपुरम या नव्या 'आयसर'मध्ये प्रत्येकी ५० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे.

येत्या ३ जूनपासून 'आयसर'ची ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया सुरू होईल. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी www.iiserpune.ac.in. या संकेतस्थळाचा आधार घ्यावा."

### वसतिगृह अंतिम टप्प्यात

'आयसर'च्या वसतिगृहाचे बांधकाम अंतिम टप्प्यात असल्यामुळे या वर्षी विद्यार्थ्यांच्या निवासाचा प्रश्न सुटला असल्याचे डॉ. अरविंद नातू यांनी सांगितले. ते म्हणाले, "पाषाण येथील 'साई ट्रीनिटी' या इमारतीत सुरू झालेल्या संकुलात सुमारे तीन कोटी रुपयांची चार उपकरणे बसवण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे क्लिष्ट गणिती प्रक्रियांसाठी महासंगणकाचे नेटवर्कही कार्यान्वित होत आहे. नामवंत विद्यापीठांतून संशोधन केलेले आणि भटनागर, 'इन्सा'सारखे प्रसिद्ध पुरस्कार मिळालेले तरुण प्राध्यापक... या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांना 'आयसर'कडे आकर्षित करत आहेत."